**<u>प्रतिवादीतर्फे उर्वरीत उलट तपास श्री. ए. जी. देशपांडे वकील.</u>**

**१४.** मी ग्रामपंचायत मिळकत क्र. २३१, २३५ व २३६ साठी स्वखर्चाने ५,५००/- खर्च करुन स्नानगृहाचे आणि शौचालयाचे बांधकाम केलेले आहे.

**१५.** मी माझ्या शपथपत्राच्या परिच्छेद क्र. ३ मध्ये सांगितलेली मिळकत आक्काबाई लांडेच्या मालकीची होती. मला ती मिळकत तिच्याकडे कशी आली होती याबाबत सांगता येणार नाही. तसेच त्याबाबतचा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. सदर मिळकत आक्काबाईची असल्या बाबतचा माझ्याकडे कागदोपत्री पुरावा असून मी त्याच्या खरेदीपत्राचा कागद न्यायालयात सादर केलेला आहे. आक्काबाईच्या नावे असलेल्या खरेदीपत्राच्या आधारे कोठेही महसूल नोंद झालेली नाही.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, जानेवारी २००९ मध्ये माझा व चंद्रकांत बंडू कांबळे याच्या सोबत सिटी सर्वे मिळकत क्र. ३८८, ३८९ व ३९० बाबत वाद झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्या दरम्यान मी, चंद्रकांत कांबळे आणि प्रतिवादींचे पुर्वहक्कदार मारुती चव्हाण यांच्या दरम्यान दि. ३०.०१.२००९ रोजी करारनामा होऊन आमच्यातील वाद मिटला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणीवपूर्वक सदर बाब या दाव्यात लपवून ठेवलेली आहे.

**१७.** सिटी सर्वे क्र. ३८८ ला आमचे आणि प्रतिवादींचे नाव आहे. मी तो कागद न्यायालयात सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीत कथन केलेल्या खुल्या जागेशी माझा संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर जागा मी सन १९५५ च्या खरेदीदस्ताने विकत घेतल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगत असलेला खरेदीदस्त बोगस व बनावट आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्याप्रमाणे प्रतिवादींनी कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादींची मिळकत लुबाडण्यासाठी खोटा दावा दाखल केला आहे.

**उलट तपास पुर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक - १३.०९.२०२४.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.